एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट, पुणे

आयोजित

राष्ट्रीय

# सरपंच संसद

ग्रामोन्नतीतून देशोन्नती

# राष्ट्रीय सरपंच संसद - संगमनेर

एक दिवसीय परीषद

१ सप्टेंबर २०१९





Under The Agies of

MIT-WPU

Dr. Vishwanath Karad MIT WORLD PEACE UNIVERSITY | PUNE

TECHNOLOGY, RESEARCH, SOCIAL INNOVATION & PARTNERSHIPS

Organized By

MIT-SOG MIT School of Government

Kindling the flame of Democratic Leadership...

Bharatiya Chhatra Sansad Foundation

UNESCO Chair for Human Rights, Democracy, Peace & Tolerance World Peace Centre (Alandi) Pune, India

Supported By

National Teachers' Congress

NATIONAL WOMEN'S PARLIAMENT

In Association with

Union Ministry of Youth Affairs & Sports, Govt. of India

Ministry of Higher & Technical Education, Govt. of Maharashtra

Ministry of Sports & Youth Welfare Govt. of Maharashtra

mitsog.org | mitwpu.edu.in

राष्ट्रीय सरपंच संसद
ग्रामोन्नतीतून देशोन्नती



## एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट विषयी

**MEER ' S MIT** ची स्थापना प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांनी १९८३ साली केली. संस्था आपल्या वैविध्यपूर्ण शैक्षणिक परंपरेसाठी ओळखली जाते. प्राथमिक शिक्षणापासून ते पदव्युत्तर शिक्षणापर्यंतचे सर्व अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटची स्थापना श्री. राहुल कराड यांनी २००५ साली सुशिक्षित तरुणांनी सक्रिय राजकारणात यावे या उद्देशाने केली आहे. संपूर्ण आशिया खंडामधील हा पहिलाच उपक्रम आहे.

राजकीय नेतृत्व आणि शासन ( मास्टर्स प्रोग्रॅम इन पोलिटिकल लीडरशिप अँड गव्हर्नमेंट ) या विषयात पदव्युत्तर शिक्षण उपलब्ध आहे. नव्याने राजकारणात कारकीर्द घडवण्याची इच्छा असणाऱ्या विध्यार्थ्यांना योग्य शिक्षण दिले पाहिजे जेणेकरून उद्याचे नेते सक्षम होतील. तसेच सुशिक्षित तरुणांनी राजकारणात अग्रेसर राहायला पाहिजे हा मुख्य ध्यास या अभ्यासक्रमामागे आहे.

राजकीय नेते, शासकीय अधिकारी, पत्रकार, न्यायाधीश, लष्करी अधिकारी आणि नामवंत प्राध्यापक अशा विविध क्षेत्रातील नामवंतांच्या मार्गदर्शनाचा लाभ विद्यार्थ्यांना होतो.

## राष्ट्रीय सरपंच संसदे विषयी

**राष्ट्रीय सरपंच संसद** ही एक आगळी-वेगळी कल्पना **राहुल कराड** (**कार्यकारी अध्यक्ष MIT-WPU, संस्थापक - भारतीय छात्र संसद, नॅशनल टीचर्स काँग्रेस, नॅशनल वूमन्स पार्लमेंट आणि MIT-SOG**) यांच्या संकल्पनेतून जन्माला आली आहे. ही संसद सरपंच, ग्रामविकास तज्ज्ञ, माध्यमे, व्यावसायिक तज्ज्ञ व शासन यांना एक व्यासपीठावर आणण्यासाठी काम करते. सरपंच हा गावाचा आणि ग्रामपंचायतीचा आधारस्तंभ असतो, तो ग्रामसभा, पंचायत आणि जिल्हा परिषद यांना जोडणारा दुवा असतो.

महाराष्ट्र ग्रामपंचायत कायदा- १९५८ यात झालेल्या नवीन दुरुस्तीमुळे, गावाच्या संमतीने प्रत्येक गावाला आपला सरपंच ठरवण्याचा अधिकार मिळालेला आहे. आता, प्रत्येक गावाचा सरपंच हा निवडलेल्या प्रतिनिधींच्याद्वारे निवडला जातो. या घटना दुरुस्तीमुळे, राज्यातील २८,३३२ ग्रामपंचायतींना आपला सरपंच, सदस्यांमधून निवडता येणार आहे.

या निवडून आलेल्या सरपंचांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे, ज्यामुळे ते आपल्या गावाचा आणि अनुषंगाने देशाचा विकास करु शकतील. सरपंचाचे सक्षमीकरण करण्यासाठी त्यांना सतत प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. याच संकल्पनेचा आधार घेऊन 'सरपंच संसदे'ची योजना केलेली आहे. या संसदेचा मूळ हेतू हा, प्रत्येक तालुक्यात आदर्श गावे निर्माण करणे हा आहे. या आदर्श आणि विकासीत गावाच्या रूपाने महात्मा गांधींचे 'सत्तेच्या विकेंद्रीकरण'चे तसेच 'ग्राम विकासा'चे स्वप्न पूर्ण होऊ शकेल. ही नव्याने विकसीत झालेली आदर्श गावे, इतर विकसनशील गावांसाठी मदतगार आणि आदर्श म्हणून काम करतील.

या संसदेत विविध क्षेत्रातील तज्ज्ञ, शेती आणि विकास, महिला सबलीकरण, पाण्याचे व्यवस्थापन, ग्रामविकास, शासनाच्या विविध योजना आणि CSR या सारख्या अनेक विषयांवर एकाच व्यासपीठावर चर्चा आणि मार्गदर्शन करतील.

राष्ट्रीय सरपंच संसद
ग्रामोन्नतीतून देशोन्नती
REPORT

## अनुक्रमणिका

संदेश : ना. बाळासाहेब थोरात २

संदेश: राहुल वि. कराड ३

उद्घाटन व
प्रकाशन समारंभ : 'सरपंचराजा' संदर्भग्रंथ ४

सत्र : केंद्र आणि राज्यशासनाच्या प्रमुख योजना
आणि त्यांची यशस्वी अंमलबाजवणी ६

समारोप :
ग्रामविकासाचे आदर्श नियोजन ११

क्षणचित्रे
राष्ट्रीय सरपंच संसद, संगमनेर १४

क्षणचित्रे
राष्ट्रीय सरपंच संसद २०१७ १६

प्रेस कव्हरेज १७



**श्री. बाळासाहेब थोरात**
आमदार आणि प्रदेशाध्यक्ष,
अखिल भारतीय कॉंग्रेस

## संदेश

'**एमआयटी पुणे**' शिक्षण समूहाच्या '**एमआयटी स्कुल ऑफ गव्हर्नमेंट**' अंतर्गत '**राष्ट्रीय सरपंच संसदे**'ची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र राज्यातील '**पंचायतराज**' व्ययस्थेतील लोकप्रतिनिधींचे ग्रामविकासासाठी प्रबोधन करणे व त्या लोकप्रतिनिधींना विकासप्रक्रियेत विविध उपक्रमांच्या माध्यमातून प्रत्यक्ष सहाय्यभूत होणे, हे महाराष्ट्र सरपंच संसदेचे उद्दिष्ट आहे.

महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यात आणि तालुक्यात या उद्दिष्टपूर्तीसाठी **राष्ट्रीय सरपंच संसदे**'चे आयोजन करण्यात येत आहे. यासाठी मी प्रथमतः **एमआयटी स्कुल ऑफ गव्हर्नमेंट चे संस्थापक श्री. राहुल कराड** यांना स्तुत्य उपक्रमासाठी धन्यवाद देतो.

सरपंच आणि इतर ग्रामपंचायत सदस्य हे भारतीय ग्राम विकासाचे खरे संसाधन आहेत. या संसाधनाची सशक्यता हा ग्रामविकासाचा मंत्र आहे. कार्यक्षम सरपंचाशिवाय ग्रामविकासाची गतिमान होऊ शकणार नाही. ही बाब लक्षात घेऊन **एमआयटी स्कुल ऑफ गव्हर्नमेंटने राष्ट्रीय सरपंच संसदे**' ची स्थापना केली ही बाब म्हणूनच फार महत्वाची आहे. या व्यासपीठाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकप्रतिनिधींचे अभ्यासपूर्वक प्रबोधन होईल आणि कार्यक्षम सरपंच निर्मितीची एक विधायक प्रक्रिया घडून येईल असा मला विश्वास वाटतो.

**स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या** पुढाकाराने महाराष्ट्र राज्यात '**पंचायतराज**' प्रस्थापित झाले. सत्तेचे विकेंद्रीकरण हे महत्वाचे उद्दिष्ट यापाठीमागे होते. ग्रामीण भागातील नेतृत्वगुणसंपन्न युवक प्रत्यक्ष सत्तेत यावेत आणि त्यांनी विकासप्रक्रिया घडवून आणावी, ही भूमिका होती.

माझ्या मते, ही भूमिका महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात यशस्वी झाली आहे. महाराष्ट्र शासनातील जवळपास सर्वच नेते हे '**पंचायतराज**' मधूनच घडून पुढे यशस्वी नेते झाल्याचे दिसत आहे.

आज ग्रामीण भागातील युवा पिढी राजकीय क्षेत्रात येण्यासाठी उत्सुक आहे. त्यांची सुरुवात ग्रामपंचायतीपासून होणार आहे. या नव्या पिढीला जर योग्य प्रबोधनाची साथ मिळाली तर ती बाब अत्यावश्यक आहे. '**राष्ट्रीय सरपंच संसद**' हे घडवून आणत आहे.

'**राष्ट्रीय सरपंच संसद**' आणि '**जयहिंद लोकचळवळ**' यांच्या संयुक्त विद्यमाने **संगमनेर** तालुकयातील ग्रामीण लोकप्रतिनिधींसाठी **दि. ०१ सप्टेंबर २०१९** रोजी '**राष्ट्रीय सरपंच संसद**' आयोजित करण्यात आली.

**डॉ. नामदेवराव गुंजाळ** यांनी संपादित केलेला '**सरपंच राजा**' हा संदर्भग्रंथ प्रकाशित करण्यात आला. या संसदेत मोठ्या संख्येने संगमनेर तालुक्यातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य सहभागी झाले.

श्री. शरद बुट्टे पाटील, श्री. माधवराव शेलगांवकर, श्री. रवींद्र हुंजे, श्री. भास्करराव पेरे पाटील आदी अनुभवी मान्यवर वक्त्यांनी या संसदेला मार्गदर्शन केले. प्रमुख संयोजक आ. डॉ. सुधीर तांबे, 'महाराष्ट्र सरपंच संसदे'चे प्रमुख संयोजक श्री. योगेश पाटील आणि सर्व टीम, डॉ. नामदेवराव गुंजाळ, श्री. इंद्रजित थोरात या सर्वांच्या प्रयत्नातून ही संसद यशस्वी झाली. मी या सर्वांचे धन्यवाद देतो.

**एमआयटी स्कुल ऑफ गव्हर्नमेंटचा** '**राष्ट्रीय सरपंच संसद**' हा उपक्रम महाराष्ट्र राज्यात सर्वत्र मोठ्या प्रतिसादाने यशस्वी होवो, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

धन्यवाद!!

राष्ट्रीय सरपंच संसद
ग्रामोन्नतीतून देशोन्नती

## संदेश



**राहुल वि. कराड**
**संस्थापक – राष्ट्रीय सरपंच संसद**

देशाच्या राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेत बदल करण्याच्या ध्यासाने आणि आपल्या नवीन पिढीला राजकीय आणि सामाजिक नेतृत्वासाठी तयार करण्याच्या संकल्पाने, MIT SCHOOL OF GOVERNMENT ची स्थापना २००५ मध्ये स्थापना झाली. जेव्हा ही स्थापना झाली तेव्हा, राजकारण हे क्षेत्र 'व्यवसाय' म्हणून निवडले जात नसे, पण शिक्षित तरुण, व्यावसायिक शिक्षण घेऊन जर राजकारणात प्रवेश करतील तर, त्याचा आपल्या समाजावर सकारात्मक परिणाम होईल, हा आमचा ठाम विश्वास आहे.

**भारतीय छात्र संसदच्या** रूपाने आम्ही आमचे क्षितीज विस्तारले, ज्यात आम्ही वर्गातील शिक्षण, वर्गाच्या बाहेर नेऊन हजारो विद्यार्थ्यांना एकाच व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न केला. गेल्या ८ वर्षांत, या संसदेत अनेक विध्यार्थ्यांच्या विविध विलक्षण कल्पना तसेच आपल्या देशाचा चेहरा मोहरा बदलणाऱ्या अप्रतिम संकल्पनांचा प्रत्यय आला आहे.

याचप्रमाणे, **नॅशनल टीचर्स कॉंग्रेस आणि नॅशनल वूमन्स पार्लमेंट** यांची सुरुवात २०१६ मध्ये केली गेली. नॅशनल टीचर्स कॉंग्रेसची सुरुवात आपल्या शिक्षकांना आपल्या देशात उच्च शिक्षणाच्या पायाभरणीसाठी प्रेरित करण्यासाठी झाली आहे. या कॉंग्रेसच्या तीन दिवसात, विविध विषय आणि चर्चांमधून हजारो शिक्षकांना आपल्या देशावर आणि समाजावर सकारात्मक परिणाम घडवण्यासाठी प्रेरित करण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच नॅशनल वूमन्स पार्लमेंटमध्ये, आम्ही महिलांचे सामाजिक, राजकीय, शिक्षण, क्रीडा, उद्योग, माध्यमे, चित्रपट, कला आणि साहित्य यात असणारे योगदान साजरे करतो. हे योगदान अजून वाढवण्यासाठी महिलांना प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न या व्यासपीठाद्वारे होतो.

पहिल्या नॅशनल वूमन्स पार्लमेंटचे आयोजन आंध्रप्रदेश विधानसभा आणि MIT SCHOOL OF GOVERNMENT यांच्या संयुक्त विद्यमाने, २०१७ मध्ये अमरावतीत केले गेले.

या वारश्याला पुढे नेत, तसेच समाजातील विविध स्तरांना एकत्र आणून, सरपंच संसदेची स्थापना, महाराष्ट्रातील ग्रामविकास समग्र पद्धतीने व्हावा, याच ध्यासाने केली आहे.

विविध विषयांवर विचार-विमर्श करून, दरवर्षी तीन दिवसात १०,००० सरपंचांना प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न आहे. या संसदेचा मूळ हेतू हा, प्रत्येक तालुक्यात आदर्श गावे निर्माण करणे हा आहे. या आदर्श आणि विकासीत गावाच्या रूपाने महात्मा गांधींचे '**सत्तेच्या विकेंद्रीकरण**'चे तसेच '**ग्राम विकासा**'चे स्वप्न पूर्ण होऊ शकेल. ही नव्याने विकसीत झालेली आदर्श गावे, इतर विकसनशील गावांसाठी मदतगार आणि आदर्श म्हणून काम करतील.

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुका हा अनेकदृष्ट्या अद्वितीय आहे, त्यामुळे '**प्रत्येक तालुक्यात एक आदर्श गाव**' या संकल्पनेमुळे सुशासन निर्माण करायला हातभार लागेल.

या सरपंच संसदेमुळे अनेक तरुण सरपंच प्रेरित होतील आणि त्याच्या रुपाने देशाला उत्तम नेतृत्व लाभेल, असा आमचा विश्वास आहे.

## उद्घाटन व प्रकाशन समारंभ : 'सरपंचराजा' संदर्भग्रंथ















संयोजक

राष्ट्रीय सरपंच संसद
ग्रामोन्नतीतून देशोन्नती

## सत्र : केंद्र आणि राज्यशासनाच्या प्रमुख योजना आणि त्यांची यशस्वी अंमलबाजवणी



**योगेश पाटील**
मुख्य समन्वयक
राष्ट्रीय सरपंच संसद

महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्थेतील सदस्यांचे मार्गदर्शन आणि प्रबोधन करण्यासाठी या सरपंच संसदेची सुरुवात झाली आहे. हे व्यासपीठ गेल्या दोन वर्षांपासून महाराष्ट्रात कार्यरत आहे. आपल्या लोकप्रतिनिधींनी हे लक्षात ठेवायला हवे की, 'जो काम करेल, तो लोकप्रतिनिधी', हा विश्वास जागवण्याचे काम देखील हे व्यासपीठ करण्याचा प्रयत्न करत आहे.

विविध स्तरावरील तज्ज्ञ, व्याख्याते आणि आदर्श गावांचे सरपंच आणि इतर सरपंच यांच्या सुसंवाद निर्माण करण्याचे काम या व्यासपीठाने केले आहे.



**डॉ. नामदेव गुंजाळ**
समन्वयक
नाशिक विभाग



जयहिंद चळवळ आणि राष्ट्रीय सरपंच संसदेत, मी सर्वांचे स्वागत करतो. या कार्यशाळेच्या निमित्ताने आपण 'सरपंचराजा' या संदर्भग्रंथाचे प्रकाशन करणार आहोत.

विकासाची व्याख्या 'प्रगतीं अशी सर्वसाधारण असली तरी, अलीकडे विकासाचे व्याख्या अशी सर्वसाधारण असली तरी अलीकडे दोन ढोबळ प्रकार पाहायला मिळतात. ते म्हणजे 'कृतिशील विकास' आणि 'आभासी विकास'. कृतिशील विकास म्हणजे विकासाच्या कामांचा फायदा हा प्रत्यक्ष रोजच्या जीवनात होतो. जसे गावाला डांबरी रस्ता झाला म्हणजे त्यावरून आपण प्रत्यक्ष प्रवास करू शकतो. पाटपाणी आले की, पिके डोलू लागतात. गावात शाळा झाली म्हणजे आपली मुले शाळेत जाऊन शिक्षण घेताना दिसतात. पण अशा पद्धतीने विकास वेगाने होतो, पण अनेकदा तो वरवरचा असतो, आभासी असतो.

असा विकास सर्वात जास्त आघात करतो तो म्हणजे तरुण वर्गावर. आज हीच अवस्था सर्वत्र दिसून येतो. जाहिराती व सोशल मिडीयाच्या माध्यमातून त्यांना दूर नेऊन, त्यांना धार्मिक, राष्ट्रीय अस्मिताच्या चुकीच्या प्रतिमांचा वापर करून तरुणांना भडकवले जाते. पण हे जेव्हा ओसरेल, त्या वेळी या देशातील तरुणांचा खूप नुकसान झालेले असेल.

हे सगळे गावपातळीवर घडत आहे. म्हणूनच सरपंच नुसताच कारभारी असून चालणार नाही. तो अभ्यासू असावा. आपल्या गावाचे हित- अहित कशात आहे? आपले नेतृत्व लाभदायक आहे ना? कोण प्रामाणिकपणे माझ्या गावाला न्याय देईल, याचा विचार सरपंचाने आणि सर्व सदस्य व गावातील जाणकारांनी करायला हवा. गावाला दीर्घकाळ विकासाची फळे मिळतील, अशी कामे ग्रामपंचायतीने करणे अपेक्षित आहे. ही कामे करून घेण्यासाठी तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर सक्षम, आणि एकनिष्ठ नेतृत्व निवडायला हवे.

सरपंचाने सतत आधुनिक जगाच्या संपर्कात राहायला हवे. यातून चूक काय व बरोबर काय? हे समजून घ्यायला हवे. आपल्या गावच्या हिताचे काय आहे व घडणाऱ्या घटनांचा गावच्या विकासावर काय परिणाम होईल? हे डोळसपणे समजून घेऊन कृती करायला हवी. आपली ही सरपंच संसद त्या दृष्टीने आपल्याला नवी दृष्टी प्रदान करेल, अशी आशा आहे.

ग्रामपंचायत व्यवस्था ही भारतीय राज्य व्यवस्थेतील सर्वात महत्त्वाची व्यवस्था आहे, ती या व्यवस्थेचा पाया आहे. या व्यवस्थेचे महत्त्व फार मोठे आहे. हा पाया तितका भक्कम, तेवढा देश सामर्थ्यवान होईल. शासनाच्या उत्तम योजनांचा लाभ करून घेण्यासाठी अभ्यासाची आवश्यकता आहे. सरपंचाला त्याचे काम उत्तमरित्या करण्यासाठी मार्गदर्शनाची तर गरज आहेच पण, त्याला या कामात मानसिक आणि आर्थिक पाठिंब्याची देखील गरज आहे. आज 'समृद्ध मानव संसाधन निर्मिती' हीच खरी देशाच्या विकासासाठी गरजेची बाब आहे.





**डॉ. सुधीर तांबे**
आमदार,
नाशिक पदवीधर मतदारसंघ

सर्व उपस्थित मान्यवर, सरपंच आणि उपसरपंचाचे मी स्वागत करतो. या उत्तम कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी योगेश पाटील यांचे आभार आणि कौतुक.

सरपंच हे लोकशाहीचे खरे रक्षक व्हायला हवे. आपल्याला लोकशाहीचे संरक्षण करणे, घटनेचे रक्षण करणे हे आपले खरे कर्तव्य आहे. स्थानिक स्वराज संस्थांनी आपल्याला लोकशाहीचे खरे अधिकार दिले आहेत.

७३ आणि ७४ व्या घटनादुरुस्तीने आपल्या पंचायतराज व्यवस्थेत रचनात्मक बदल घडवले. याचसोबत या पंचायतराज कायद्याने आर्थिक स्वातंत्र्य दिले.

ग्रामपंचायतीत लोकनियुक्त प्रतिनिधी म्हणून निवडून येणे ही बाब सध्या सोपी राहिलेली नाही. अनेक चुकीच्या बाबींमुळे दिवसेंदिवस जातील होत चाललेली ही बाब जो नियंत्रित करून यशस्वी होतो असा लोकप्रतिनिधी आज निश्चितपणे कुशलच मानला पाहिजे. पण त्यांची परीक्षा केवळ इथेच संपत नाही, तर सत्ताप्राप्तीनंतरच ती खऱ्याअर्थाने सुरु होते असे म्हणले तरी चूक ठरणार नाही.

निवडून आल्यानंतर आपली कारकीर्द यशस्वी करण्यासाठी ज्या नानाविध बाबी अवगत आणि आत्मसात करीत लोकप्रतिनिधीला वाटचाल करावी लागते त्यातच त्यांची खरी परीक्षा होते असे मला फार तीव्रपणे वाटते.

आपल्या सरपंचाना यासाठी नितांत गरज असते ती तज्ज्ञांच्या अनुभवी मार्गदर्शनाची व अचूक दिशादर्शनाची! याचसाठी आपल्याला 'सरपंच संसद' ची गरज अजून वाढते. म्हणूनच असे अनेक कार्यक्रम महाराष्ट्रात सर्व दूर व्हावे, अशीच इच्छा मी व्यक्त करतो.

सरपंचाने कायम हे लक्षात ठेवायला हवे की, लोक आपले नाव काढतील, असे काम करा. उत्तम काम हे उत्तम प्रशिक्षणातून निर्माण होईल, हा माझा विश्वास आहे आणि हाच या कार्येक्रमाचे ध्येय आहे.



**शरद बुट्टे पाटील**
जिल्हा परिषद सदस्य,
'यशदा' प्रशिक्षण केंद्राचे
मानद व्याख्याते-



भारतीय त्री-स्तरीय रचनेतील सरावात मोठा आणि ताकदीचा लोकप्रतिनिधी म्हणजे सरपंच होय. गाव हाच देशाच्या विकासाचा केंद्रबिंदू आहे, म्हणूनच मी सर्वांना विनंती करतो की, तुमची ग्रामपंचायत एक ***NGO*** आहे, अशा पद्धतीने काम करा. असा विचार करून सर्व योजनांची बांधणी करा.

आपल्या क्षमता आणि कार्यशीलता यांचा योग्यरित्या उपयोग करून आपण विकास केला पाहिजे. तुमचे गाव नीट समजून घ्या. योजनांच्या दृष्टीकोनातून तुमचे गाव समजून घ्या. तुमच्या गावाची ताकद समजावून घ्या.

मोठ्या मोठ्या इमारती आणि गुळगुळीत रस्ते म्हणजे विकास नव्हे. मानवी विकासाचा निर्देशांकाच्या अनुषंगाने योजना आखा. मानवी विकास झालाच तरच भौतिक विकासाला अर्थ आहे.

तुमच्या व्यवहारज्ञानाला प्रशिक्षणाची जोड द्या. कायम लक्षात ठेवा, जसे अधिकार वाढतात, तश्या जबाबदाऱ्या पण वाढतात. सरपंचाने स्वतः स्वावलंबी व्हायला हवे. योजना खूप आहेत पण, आमचा समन्वय कमी पडतो आहे.

आपल्या गावच्या ग्रामसभेला इतके ताकदवान करा की, म्हणजे तुमचे लोक तुमच्याशी कायमचे जोडले जातील.

आपल्या गावाचा गुणात्मक विकास करण्याचा प्रयत्न करा. आराखडा तयार करताना स्वतः जातीने तिथे उपस्थित राहा. आरोग्य, शिक्षण आणि स्वच्छता या बाबींवर जास्त लक्ष द्या.

या सरपंच संसदेचा हेतू हा फक्त तुमच्यामध्ये सर्वांगीण ग्रामविकासाचे स्फुलिंग पेटवणे हा आहे, पण यातून शिकून तुम्ही तुमचे गाव बदलावे व सर्वांच्यासमोर एक उत्तम उदाहरण सर्वांपुढे उभे करावे.





**माधवराव शेलगांवकर–**
माजी सरपंच - शेलगाव
ज्येष्ठ पंचायतराज तज्ञ

मी सुरवातीला आपल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे स्मरण करतो, त्याच्या एका वाक्याने, माझे आणि माझ्या गावाचे जीवन बदलून टाकले.तुझे गावच नाही का तुझे तीर्थ– तुमच्या गावाला सर्वात जास्त महत्त्व द्या. मी माझ्या आयुष्यात या तत्त्वाला अनुसरून माझ्या गावाला बदलण्याचा प्रयत्न केला, त्याचे फळ म्हणून आम्हाला अनेक पुरस्कार मिळाले. जेव्हा तुम्ही खूप कष्ट करून आपली गुणवत्ता सिद्ध करता, तेव्हाच तुम्हाला भक्कम पाठिंबा मिळतो.

कोणत्याही गोष्टीच्या यशासाठी तीन तत्त्व महत्त्वाची आहेत– घपुेश्रशवसश, लरीशर्षीश्र, आणि लहशशीर्षीश्र.

कोणतेही मार्गदर्शन आणि ज्ञान हे ओझे म्हणून घेऊ नका.

ज्याच्यामुळे आपला वेळ, पैसा आणि कष्ट या मूल्यवान गोष्टी वाया जातात, ते थांबवण्यासाठी सर्वार्थाने प्रयत्न करा.

गावाचे स्वरूप मला बदलायचे आहे, आपण कोणत्याही पक्षाचे सरपंच नाही, तर गावाचे सरपंच आहात, हे लक्षात ठेवा. आपण हे सगळे करताना आयुष्य कायम आनंदी आणि हसरे ठेवा.

तुमच्या आयुष्यात तीन '**H**' वापरा– **Head, Heart & Hand**.

असे काही चांगले काम करा की, पुढे भविष्यात तुमच्या निर्णयाची किंमत सिद्ध होत राहील.

तुमचे चांगले-वाईट सगळे तुम्ही करू शकता, देवाच्या भरवश्यावर बसू नका. देवाने तुम्हाला सगळे दिले आहे, त्याचा वापर करून आपल्या गावाच्या आणि पर्यायाने देशाचा विकास घडवा.

चांगले विचार आत्मसात करा, चांगली कृती तुमच्या हातून घडू द्या. एक चांगला सरपंच म्हणून नावलौकिक मिळवा.





**राजेंद्र हुंजे**
ज्येष्ठ पत्रकार

## समारोप : ग्रामविकासाचे आदर्श नियोजन

समृद्धी म्हणजे नेमके काय? आदर्श गाव कशाला म्हणायचे? आदर्श ग्राम नियोजन कशा पद्धतीने केले पाहिजे, हेच तर आजचे कळीचे मुद्दे आहेत.

आपल्या कार्यक्रमाचे घोषवाक्य आहे की 'ग्रामोन्नत्ती तीच देशोन्नत्ती', हीच खरी आजची गरज आहे. आपल्यातील काही नेते जसे की पेरे पाटील, यांनी आपल्या गावाला आधी सुधारले, त्यामुळे तिथून बाहेर पडलेला प्रत्येक व्यक्ती किंवा तरुण, आपल्यासोबत देशाची उन्नती करण्याची उर्मी घेऊन गेला आहे. या उर्मीसाठी आपल्याला स्वतःच्या गावाला आधी सवय लावायला पाहिजे.

जे आपण ठरवले आहे ते कृतीत आणणे म्हणजे नियोजन.

आज आपली तरुणाई नवीन तंत्रज्ञानाच्या मागे जात आहे, त्याच तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्या गावाची सुधारणा करायला हवे. हा विचार आपल्यामध्ये रुजायला हवा.

खरं तर, अनेकदा नियोजन योग्य असते, पण कृतीत गल्लत होते.

गावाच्या विकासाचे नियोजन केवळ कागदावर करून चालणार नाही. गावाच्या विकासाचे नियोजन प्रत्येकाने हातात हात घालून करायला हवे.

आजच्या पिढीला घडवताना, त्याच्या मनात पहिल्यापासून ग्रामनियोजनाची जाणीव निर्माण करायला हवी.

गावाला सुधारण्यासाठी घरातील आजीपासून शाळेतील मूलापर्यंत सर्वांना एकत्र यावे लागेल, तर आणि तरच ग्रामोन्नतीतून देशोन्नती होईल.

आज आपल्याला आपल्या गावाच्या संपन्नतेसाठी वज्रमूठ बांधली पाहिजे.





**भास्करराव पेरे पाटील**
सरपंच पाटोदा गाव
राष्ट्रपती पुरस्कार विजेते

आपल्या संविधानाने आपल्यावर खूप उपकार केले आहेत की सरपंचाला कोणत्याही पक्षाचे तिकीट नाही.

माझी सर्व सरपंच सदस्यांना विनंती आहे की, कोणत्याही पक्षाचा आमदार असो, खासदार असो, त्याचा सन्मान करा, पण त्या राजकारणात न अडकता, आपल्या गावाची प्रगती करा.

लेकरू आईचं ऐकतं, तसेच सरपंचाने गावाची आई व्हायला हवे. आई जशी बाळाचे सर्व लाड पुरवत खाऊ घालते, तसेच सरपंचाने गावात काम करायला हवे.

आज माझे इतके सत्कार, पुरस्कार होतात, ते मी माझे काम मन लावून केले म्हणून, मला तुम्हाला इतकंच सांगायचे आहे की, तुम्ही लहान आहात म्हणून, काही करू शकत नाही, असे समजू नका, तुम्ही ठरवले तर काहीही करु शकतो. फक्त इमानाने आपल्या गावात काम करायचे.

हे करू नका, हे सांगायची गरज नाही, काय करायचे ते सांगा. आपल्याला सरपंचाची प्रतिमा बदलायची आहे, आम्हाला समाजापुढे वेगळा सरपंच ठेवायचा आहे. आपल्याला गावाच्या सर्व कुटुंबाचा विचार करून, नियोजन करा. पंचायतीचे उत्पन्न वाढवा आणि त्यातून लोकांना सुविधा द्या. मेहनत करा, कष्टांशिवाय गावाचा विकास होणार नाही.

आपल्या गावाचा विकास करायचा असेल तर, पाच गोष्टी महत्वाच्या- स्वच्छ प्यायचे पाणी, वापरलेले पाणी जमिनीत जिरवा, गावाची स्वच्छता, फळझाडे लावा आणि मुलांचे शिक्षण.

सरपंचाने आपल्या लोकात राहून डोके वापरून सर्व कामे केली पाहिजे.



राष्ट्रीय सरपंच संसद
ग्रामोन्नतीतून देशोन्नती

## आभारप्रदर्शन



**इंद्रजीत थोरात**
संचालक
सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
सहकारी साखर कारखाना

जयहिंद लोकचळवळ आणि **MIT-SOG** यांच्या संयुक्त विद्यमानाने, आज राष्ट्रीय सरपंच संसद संपन्न झाली आहे. या परिषदेत विविध मार्गदर्शकांनी येऊन, चांगला आणि सशक्त विचार रुजवला आहे, यात राजेंद्र हुंजे, बुट्टे पाटील साहेब या सारख्या मान्यवरांचा समावेश होतो.

कोणीही सरपंच झाला की, एक उत्साह असतो, आनंद असतो, यासर्वांना 'गाढवाच्या लग्नासारखे' एका रात्रीत सात माडीचा महाल बांधायचा असतो. गावाचा विकास करायचा असतो, पण हे करताना चुका होऊ शकतात आणि त्याची झळ गावाला पोचू शकते.

हे होऊ नये म्हणून, नामदेवरावांनी एक चॅन पुस्तिका आपल्या सर्वांसाठी तयार केली आहे, आपल्याला भेट दिली आहे.या पुस्तिकेत सरपंचांची कर्तव्ये, पंचायत समितीची कामे तसेच विविध योजना, पाणी पुरवठा याच्या विषयी माहिती दिली आहे. तसेच उडठ सारखे नवे क्षेत्र कसे हाताळायचे, यांचे मार्गदर्शन आहे.

आज दिवसभर आपणा सर्वांना या लोकांचे मार्गदर्शन लाभले. पुस्तक रूपाने आपण ते बरोबर देखील नेणार आहोत. मी मंचावरील सर्व मान्यवरांचे आभार मानतो. आपण इथे आलात, वेळ दिलात, खूप धन्यवाद!

मी आपण सर्वांचे देखील आभार मानतो, की आज आपण सर्व देखील दिवसभर आमच्यासोबत राहिलात, हा कार्यक्रम संपन्न केलात. खूप आभार आणि धन्यवाद!

राष्ट्रीय सरपंच संसद – संगमनेर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक महेश साने यांनी केले होते.



## क्षणचित्रे
## राष्ट्रीय सरपंच संसद
## संगमनेर






















संगमनेर तालुका सरपंच संसद
संगमनेर तालुक्यातील सर्व सरपंच, उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांचे एकदिवसीय अधिवेशन
आपले सहर्ष स्वागत करीत आहे

## क्षणचित्रे
## राष्ट्रीय सरपंच संसद
## २०१७















# गाव विकासासाठी ग्रामपंचायतींनी पूर्ण क्षमतेने काम करावे-आ. डॉ. तांबे




# ग्रामपंचायतींनी कार्यक्षमतेने काम केल्यास गावे समृद्ध : आ. तांबे



# गावांच्या विकासासाठी ग्रामपंचायतींनी कार्यक्षमतेने काम करावे - आ.डॉ.सुधीर तांबे

## सरपंच संसदेत ग्राम विकासावर चर्चा : काँग्रेसमुळे पंचायतराज सक्षम



# काँग्रेसमुळेच पंचायतराज सक्षम : डॉ. तांबे

## संगमनेरमध्ये सरपंच परिषदेत ग्रामविकासावर चर्चा



# गावच्या विकासासाठी ग्रामपंचायतीने कार्यक्षम व्हावे : आ. डॉ. तांबे

## सरपंच संसद परिषदेत ग्रामविकासावरील चर्चेला उत्स्फूर्त प्रतिसाद



# संगमनेरात रविवारी सरपंच व सदस्यांसाठी मार्गदर्शन शिबिर

संगमनेर (प्रतिनिधी):- पंचायतराज व्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या ग्रामपंचायत सरपंच व सर्व सदस्यांसाठी रविवार दि. १ सप्टेंबर २०१९ रोजी ग्रामपंचायत कामकाज [illegible] प्रभावी अंमलबजावणीसाठी एक दिवसीय सरपंच संसद शिबिर आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती आयोजक आ. डॉ. सुधीर तांबे यांनी दिली. जयहिंद लोकचळवळ व [illegible] कारखान्याचे संचालक इंद्रजीत थोरात हे उपस्थित राहणार आहेत. या शिबिरामध्ये पुणे जिल्हा परिषदेचे माजी सभापती व [illegible] बुद्ध पाटील आदर्शगाव पाटोदा जिल्हा औरंगाबादचे सरपंच भास्करराव पेरे पाटील, ग्रामविकास तज्ज्ञ मार्गदर्शक माधवराव शेळगावकर, ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र हुंजे, प्रमुख समन्वयक योगेश पाटील हे मार्गदर्शन करणार आहेत.

# गावांच्या विकासासाठी ग्रामपंचायतींनी कार्यक्षमतेने काम करावे- आ. डॉ. तांबे



जयहिंद लोकचळवळ व महाराष्ट्र सरपंच संसद यांच्यावतीने आयोजित सरपंच परिषदेत मार्गदर्शन करताना आमदार डॉ. सुधीर तांबे व उपस्थित मान्यवर.

# संगमनेर मध्ये रविवारी सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांसाठी मार्गदर्शन शिबिर



राष्ट्रीय
सरपंच संसद
ग्रामोन्नतीतून देशोन्नती

# राष्ट्रीय सरपंच संसद - संगमनेर

एक दिवसीय परीषद

१ सप्टेंबर २०१९

एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट
स. नं. १२४, पौड रोड, कोथरूड, पुणे - ४११०३८. भारत
संपर्क: ९८५०८९७०३९, ९१४६०३८९४२, ७७२००६१६११ इमेल : *info@mitsog.org*

Under The Agies of
MIT-WPU
॥ विश्वशान्तिर्ध्रुवं ध्रुवा ॥
Dr. Vishwanath Karad
MIT WORLD PEACE UNIVERSITY | PUNE
TECHNOLOGY, RESEARCH, SOCIAL INNOVATION & PARTNERSHIPS

Organized By
MIT-SOG MIT School of Government
*Kindling the flame of Democratic Leadership...*
Bharatiya Chhatra Sansad Foundation

Supported By
UNESCO Chair for Human Rights, Democracy, Peace & Tolerance
World Peace Centre (Alandi) Pune, India
National Teachers' Congress
National Women's Parliament

In Association with
Union Ministry of Youth Affairs & Sports, Govt. of India
Ministry of Higher & Technical Education, Govt. of Maharashtra
Ministry of Sports & Youth Welfare Govt. of Maharashtra
सत्यमेव जयते